गोवादूत : पणजी – शनिवार, दि. १४ मार्च २०१५

# जीवनाकडे सकारात्मकतेने पाहा : हेगशेट्ये

## लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप

**दोडामार्ग, दि. १३ (प्रतिनिधी)**

'विद्यार्थ्यांनी जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे. पदवीनंतर आज नोकरी-व्यवसायासाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. त्या मिळवण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या अंगी असलेल्या सुप्त-गुणांना ओळखले पाहिजे. स्वतःमधील क्षमता ओळखून व विविध कौशल्याच्या आधारे विकास करून जीवन घडवले तरच आपण यशस्वी व्हाल.' असे प्रतिपादन नवनिर्माण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा रत्नागिरीतील ज्येष्ठ पत्रकार अभिजित हेगशेट्ये यांनी केले. येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या शुभेच्छा समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील हे होते.

प्रारंभी दीपप्रज्वलन व स्वागतगीताने विद्यार्थ्यांनी समारंभाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बी. ए. आणि बी.कॉम.च्या सत्र पाच परीक्षेत विशेष गुणांसह उत्तीर्ण झालेल्या वंदना पटकारे, ईशा बर्वे, स्वप्नगंधा नाईक व पूनम परब या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रा. डी. वाय. बर्वे व प्रा. डॉय एम.टी. बेग यांनी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांच्या पुढील वाटचालीस व परीक्षेकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रा. डी. वाय. बर्वे, प्रा. डॉय एस. यु. दरेकर, प्रा. डॉ. आर. एर. इंगळे, प्रा. पी. एन. ढेपे, प्रा. एस. एस. एम. जाधव, प्रा. एस. एन. खडपकर, प्रा. एस. एस. पाडगावकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पाडगावकर आणि मिना कुडचिरकर यांनी केले. प्रास्ताविक व स्वागत प्रा. सोपान जाधव यांनी तर प्रा. ढेपे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दोडामार्ग येथील हळबे महाविद्यालयात मार्गदर्शन करताना संस्थाध्यक्ष अभिजित हेगशेट्ये. सोबत शिक्षक.